# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२६
## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजता)

**म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

**श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, अंबादास दानवे, अरुण लाड, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, सुधाकर अडबाले, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, **वि.प.स यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव – (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ठेकेदारी मध्ये झालेला गैरव्यवहार, राज्यभरातील ठेकेदारांची करोडो रुपयांची देणी प्रलंबित असणे, कंत्राटदारांना कामांची बिले मिळाली नसल्याने सुमारे ३ लाख कंत्राटदारांनी काम बंद करण्याचा इशारा देणे, प्रलंबित देयके मिळविण्यासाठी टक्केवारीची मागणी करणे, प्रलंबित बिलांमुळे लहान व मध्यम कंत्राटदार आर्थिक अडचणीत सापडल्याने व्यवसाय बंद करणे, तसेच आत्महत्येचा मार्ग स्वीकारणे, नगरविकास विभागाकडून वित्त आयोगाचा मिळणारा पैसा रखडल्याने महानगरपालिका, नगरपालिका या स्थानिक संस्थांचे विकास कामे थांबणे, महानगरपालिका व नगरपालिका यामध्ये नोकर भरती न होणे, मुंबईसह अनेक महापालिकांमध्ये पाणीटंचाई व पाणीचोरीच्या घटना घडणे, अनधिकृत बांधकामे, विकासकाम, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता व बांधकाम परवानग्यांमध्ये गैरव्यवहाराच्या तक्रारी असणे, आर्थिक गैर व्यवस्थापन असणे, वाहतूक व पार्किंग समस्यांमुळे नागरीक त्रस्त होणे, महानगरपालिकांना जी.एस.टी. कमी मिळत असल्याने विकासकामे थांबणे, पुणे येथील बनावट दारु प्रकरण नुकतेच उघडकीस येणे, ग्रामीण भागात अवैध दारु व्यवसाय रोखण्यास अपयश येणे, छत्रपती संभाजीनगर येथे उत्पादन शुल्क विभागाने ९ किलोहून अधिक गांजा जप्त करणे, नवीन कामगार संहितांमुळे वेतन, कामाचे तास, ओव्हरटाईम, कंत्राटीकरण आणि कामगार हक्क कमी होण्याच्या भीतीमुळे अनेक संघटनांनी आक्षेप घेणे, त्यांचे पगार, भविष्य निर्वाह निधी गणनेत बदल झाल्याने व अन्य मागण्यांसाठी कामगार संघटनांनी चिंता व्यक्त करणे, कामगार कल्याण योजनांच्या लाभ वितरणात विलंब होत असल्याचा आरोप विविध संघटनांकडून होणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**(क) तारांकित प्रश्न**

**(ख) अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली ते दहावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **उप मुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री** : शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांचे सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** :

**(क)** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(छ)** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ज)** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(झ)** हैद्राबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट समूह विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२०-२०२१ ते सन २०२४-२०२५ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ञ)** महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ट)** महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ठ)** महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ड)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ढ)** मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(ण)** एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२२-२०२३ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(त)** महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(थ)** महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास)**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

**(गुरूवार, दिनांक २ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन (अनुक्रमांक १):-**

(१) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ९ वर सामाजिक न्याय मंत्री निवेदन करतील :-**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील रमाई आवास घरकुल योजनेअंतर्गत घरकुल मंजुरी व बिल वाटप प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात झालेला आर्थिक गैरव्यवहार.

(२) **श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १३ वर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

जिल्हा ग्रंथालय संघ, विभाग ग्रंथालय संघ व महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ यांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत.

(३) **श्री.जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १५ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

इयत्ता ९ व १० वी च्या गटातील संच मान्यतेच्या सूत्रात दिलेली सूट रात्र शाळांना आणि शहरातील अटींचे पालन करणाऱ्या शाळांना लागू करण्याबाबत.

(४) **श्री.सत्यजित तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ११ वर सामाजिक न्याय मंत्री निवेदन करतील :-**

महाराष्ट्र जादूटोणाविरोधी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीतील कमालीची उदासीनता, नियमावलीचा अभाव आणि जिल्हास्तरीय समित्यांच्या रखडलेल्या नियुक्त्यांबाबत.

(५) **ॲड.अनिल परब, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १० वर परिवहन मंत्री निवेदन करतील :-**

एस.टी. महामंडळाच्या तत्कालीन अध्यक्षांची दिशाभूल केलेल्या व्यवस्थापकीय संचालक, वित्तीय सल्लागार व महाव्यवस्थापक (वाहतूक) यांची सखोल चौकशी करुन कारवाई करण्याबाबत.

(६) **श्री.धीरज लिंगाडे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १४ वर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांना संगणकीय कामे न देता प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रावर डाटा एन्ट्री ऑपरेटर नेमण्याबाबत.

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **सर्वश्री धैर्यशिल कदम, विक्रांत पाटील, सदाशिव खोत, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाबळेश्वरवाडी (ता.माण, जि.सातारा) येथील विकास कार्यकारी सहकारी सोसायटी व इतर सहकारी सोसायटीमध्ये मयत व्यक्तींच्या नावावर कर्ज मंजूर करून सदरहू कर्जाची रक्कम मयत व्यक्तीची बनावट कागदपत्र व बनावट स्वाक्षरीच्या सहाय्याने काढल्या प्रकरणी दिनांक २२ जून, २०२६ रोजी म्हसवड पोलीस स्थानकात तक्रार / निवेदन दिल्याची बाब निदर्शनास येणे, या प्रकरणी अतिशय कमी क्षेत्रावर लाखो रूपयांचे कर्ज मंजूर करण्यात येणे, सोसायटीच्या चेअरमनच्या मयत आईच्या नावावर कर्ज वाटप करण्यात येणे तसेच काही मयत व्यक्तींच्या नावावरील कर्ज भरणा केलेला असतानाही त्या कर्जाचे पुनर्गठन करण्यात येणे, मयत व्यक्तीच्या नावावर संबंधितांनी शासकीय कर्ज माफीचा फायदा घेणे, संबंधित सोसायटीचे पदाधिकारी व बँक अधिकारी यांनी परस्पर संगनमत करून मयत व्यक्तींच्या बनावट स्वाक्षऱ्या व कागदपत्रांच्या आधारे मोठ्या रकमेचा अपहार करून भ्रष्टाचार केल्याची बाब निदर्शनास येणे, या प्रकरणी दिनांक ३१ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सातारा व इतर शासकीय कार्यालयांकडे तक्रारी करूनही या प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, शासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तातडीने फौजदारी कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. झीशान सिद्दिकी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"मुंबई वांद्रे रेल्वे स्थानकाजवळील गरीब नगर झोपडपट्टी भागात अंदाजे ३५९ अतिक्रमक वास्तव्यास असून रेल्वेच्या ६ व्या मार्गीकेचा प्रकल्प विकसित करण्यासाठी तसेच अतिरिक्त सुविधांची उभारणी आणि विद्यमान रेल्वे मालमत्तेची योग्य देखभाल करण्यासाठी ही अतिक्रमणे हटविणे, रेल्वे प्रशासनाने अतिक्रमणे हटविल्यामुळे मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असता सदरहू अतिक्रमणे हटविण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार ३५९ अतिक्रमकांपैंकी सुमारे १०० अतिक्रमक्रांवर ६ व्या मार्गीकेच्या प्रकल्पाचा थेट परिणाम होत असल्यामुळे त्यांचे अतिक्रमण हटवून त्यांचे पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने विभागीय अभियंता (इस्टेट/दक्षिण) रेल्वे प्रशासन यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये पत्राद्वारे कळविण्यात येणे, याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने अद्याप कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे रेल्वे प्रशासनास रहिवाशांच्या अतिक्रमणामुळे काम करण्यास येत असलेल्या अडचणी, तसेच न्यायालयाच्या निर्णयानुसार अंदाजे ३५९ अतिक्रमीत रहिवाश्यांचे पुनर्वसन तात्काळ केल्यास रेल्वेस काम करणे सोयीस्कर होणार असल्यामुळे शासनाने याबाबत लक्ष घालून अतिक्रमक रहिवाश्यांचे तात्काळ पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(३) **सर्वश्री प्रविण पोटे-पाटील, ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यातील वासनी मध्यम प्रकल्प, चंद्रभागा प्रकल्प, सापन मध्यम प्रकल्प व भगाडी नाला प्रकल्प तसेच चांदुर बाजार तालुक्यातील पिंपरी साठवण तलाव, राजना पूर्णा प्रकल्प, गणोजा बेलोरा प्रकल्प, राजुरा प्रकल्प, करजगांव प्रकल्प व बोर्डी नाला प्रकल्पांची कामे गत अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, वासनी प्रकल्प बाधित बोरगावं दोरी व बोरगावं तळणी प्रकल्पाची अनेक कामे निधी अभावी प्रलंबित असणे, बोरगावं पेठ गावाच्या पुनर्वसनाबाबत नियामक मंडळाच्या माहे डिसेंबर, २०२४ मध्ये झालेल्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात येऊनही सदर काम प्रलंबित असणे, राजुरा गावाच्या पुनर्वसनाबाबतची कार्यवाही प्रलंबित असणे, यास्तव लोकप्रतिनिधी तथा माजी राज्यमंत्री यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक २६ मे, २०२६ रोजीच्या पत्राद्वारे अमरावती जिल्ह्यातील प्रलंबित प्रकल्पांची माहिती देऊन प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत अधीक्षक अभियंता, अमरावती यांना कळविले असणे, याबाबत कार्यवाही होऊन प्रकल्प पुर्ण होण्याची आवश्यकता, यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री धीरज लिंगाडे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य शासनाने शालेय शिक्षण विभागांतर्गत केंद्रप्रमुख पदासाठी सेंट्रल TET परीक्षा माहे फेब्रुवारी,२०२६ रोजी घेण्यात येणे, या परिक्षेचा निकाल मार्च,२०२६ मध्ये लागणे, शासनाने दिनांक २० फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये माहे जानेवारी / फेब्रुवारी, २०२६ पर्यंत TET उत्तीर्ण उमेदवारांनाच केंद्रप्रमुख म्हणून घ्यावे, असे निर्देश देणे, वास्तविक, या पदाच्या जाहिरातीमध्ये केंद्रप्रमुख पदासाठी TET/CTET पात्र होणे, एवढीच अट असणे, शासनाने या वेळेवर घातलेल्या अटीमुळे CTET पात्रता परीक्षा उत्तीर्ण व गुणवत्ता यादीत असूनही उमेदवारांवर अन्याय झालेला असणे, अनेक उमेदवार नियुक्तीपासून वंचित होणे व त्यांनी केंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती मिळावी, अशी मागणी करीत असतानाही शासन दाखवित असलेली अनास्था, परिणामी शासनाप्रती होणारा असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनस्तरावरुन उत्तीर्ण व गुणवत्ता यादीत नाव असलेल्या उमेदवारांना केंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती करण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री सुधाकर अडबाले, अभिजित वंजारी, अशोक जगताप, जयंत आसगावकर, रामभाऊ लिंगाडे, सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, डॉ. परिणय फुके, श्री. सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर, जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन परिपत्रक दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ अन्वये उच्च प्राथमिक स्तरावर गणित/विज्ञान, भाषा आणि सामाजिक शास्त्र या विषय संवर्गातील प्रत्येक किमान एक याप्रमाणे प्रशिक्षित पदवीधर अर्हता धारक शिक्षकांच्या नियुक्त्या प्राथमिक शिक्षकांमधून करण्यात आलेल्या असणे, परंतु, या प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांपैकी १/३ शिक्षकांना सेवाजेष्ठतेप्रमाणे पदवीधर वेतनश्रेणी देण्यात आलेली असणे, याविरूध्द राज्यातील याचिकाकर्त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल करून 'समान काम - समान वेतन' या नैसर्गिक न्याय तत्वानुसार सर्व विषय शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी देण्याबाबत विनंती केलेली असणे, त्यानुसार मा. न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या बाजूने निर्णय दिलेला असणे, त्यामुळे सरसकट वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शिक्षक संघटनांनी केलेल्या मागणीचे गांभीर्य लक्षात घेता मुंबई उच्च न्यायालयाच्या, नागपूर खंडपीठाच्या निकालानुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित संस्थांमध्ये इयत्ता ६ वी ते ८ वी

मध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांना सरसकट पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनाने याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री. संजय भेंडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वर्धा जिल्ह्यात १०० खाटांचे महिला व नवजात शिशु रुग्णालय उभारण्यास दिनांक २४ जून, २०१३ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असणे, या प्रकल्पासाठी सुरुवातीला रूपये १४ कोटींची व वाढीव रूपये २१.३० कोटींची प्रशासकीय मान्यता असणे, सदर रुग्णालयाच्या इमारतीचे G+1 बांधकाम पूर्ण झाले असून पुढील टप्प्यात G+2 बांधकाम, फर्निचर, बॉम्बे सेल, एलपीजी, ईटीपी, इतर आवश्यक सुविधा उभारण्यासाठी सुमारे रूपये १८.६४ कोटींचा अंदाजपत्रक प्रस्ताव जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाकडून आरोग्य उपसंचालक यांच्याकडे सादर केला असणे, मात्र, प्रशासकीय व तांत्रिक प्रक्रियेमधील विलंबामुळे आजतागायत रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरू होऊ शकलेले नसणे, सध्या इमारत दर्शनी स्वरूपात तयार असली तरी आवश्यक फर्निचर, उपकरणे व नवजात शिशूंसाठी स्वतंत्र कक्ष उपलब्ध नसल्याने ती वापरात आणता येत नसणे, परिणामी, वर्धा जिल्ह्यातील महिला व नवजात शिशूंना अपेक्षित आरोग्य सुविधा मिळण्यात अडचणी निर्माण होत असणे, तसेच दीर्घकाळ इमारत रिकामी असल्याने साहित्याचे नुकसान व चोरी होण्याच्या घटना निदर्शनास येत असणे, सार्वजनिक निधीतून उभारलेल्या या प्रकल्पाचे संरक्षण तातडीने कार्यान्वयन करणे आवश्यक असणे, त्यामुळे शासनाने या प्रकल्पासाठी आवश्यक निधी तात्काळ मंजूरी आवश्यक असणे,उर्वरित बांधकाम, उपकरणांची पूर्तता करून १०० खाटांचे महिला व नवजात शिशु रुग्णालय त्वरित कार्यान्वित करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

**पाच : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**सहा : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा–**

(क) **श्री. विक्रांत पाटील,** श्रीमती उमा खापरे,श्री. प्रसाद लाड, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"पनवेल महानगरपालिका क्षेत्र सुमारे ११० चौ.कि.मी. असून वाढत्या लोकसंख्येनुसार पायाभूत सुविधांचे दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक असणे, शेलार धरण पूर्ण होईपर्यंत प्रलंबित पाणीपुरवठा योजना पूर्ण करून मोर्बे धरणातून अतिरिक्त पाणीपुरवठा उपलब्ध करुन देणे, वाढत्या वाहनसंख्येमुळे सिडकोमार्फत भूखंड उपलब्ध करून बहुमजली पार्किंग प्रकल्प उभारणे, पुढील वीस वर्षांचा

विचार करून वीज वितरण व्यवस्था सक्षम करावी व वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविणे, तळोजा एमआयडीसी परिसरातील औद्योगिक प्रदूषण रोखण्यासाठी सांडपाणी व विषारी रसायने सोडणाऱ्या उद्योगांवर कठोर कारवाई करणे, डम्पिंग ग्राउंड नागरी वस्तीपासून दूर स्थलांतरित करून महानगरपालिकेचा स्वतंत्र कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे, खारघर, तळोजा, कामोठे व इतर भागांत अत्याधुनिक अग्निशमन केंद्रे सुरू करणे, सांस्कृतिक विकासासाठी नाट्यगृहे, कला दालने, प्रदर्शन केंद्रे व सांस्कृतिक कट्टे उभारणे, युवकांसाठी आधुनिक क्रीडासंकुले व नागरिकांसाठी अत्याधुनिक सार्वजनिक वाचनालये उभारणे, कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना ठोक मानधन, योग्य वेतन, पीएफ, ईएसआयसी व इतर वैधानिक लाभांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(ख) **सर्वश्री संजय खोडके,** विक्रम काळे, इद्रिस नायकवडी, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा** –

"राज्यातील इतर विभागांच्या तुलनेत अमरावती विभागातील औद्योगिक स्थिती अत्यंत चिंताजनक असून,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटक आणि सूक्ष्म,लघु व मध्यम उपक्रमांची संख्या संपूर्ण राज्यात या विभागात सर्वात कमी असल्याचे दिसून येणे, हा भाग मुख्य कापूस उत्पादकपट्टा असूनही या विभागात केवळ मोजक्याच मोठ्या उद्योगांची उपस्थिती असणे, उद्योगांच्या अभावामुळे रोजगाराच्या संधीही तुलनेने खूपच कमी असणे, अमरावती येथील 'पीएम मित्र' पार्क हा महाराष्ट्रातील महत्त्वाचा वस्त्रोद्योग प्रकल्प आहे, मात्र येथील जमिनीचे भाव अधिक असल्याने गुंतवणूकदारांमध्ये साशंकता असू शकते, त्यामुळे हे भाव कमी करणे गरजेचे असणे, तसेच 'पीएम मित्र' पार्कसाठी 'Project Management Consultant' (PMC) किंवा तत्सम विशेष तज्ज्ञ यंत्रणा नेमणे गरजेचे असणे, औद्योगिक वसाहतींमधील मोठ्या प्रकल्पांच्या दिरंगाईबाबत बोलायचे झाल्यास, रेमंड कंपनीला प्लांटसाठी ५०० एकर जागा देण्यात आली असून त्यापैकी केवळ ३८ एकरवर काम सुरू असणे तसेच ठरल्याप्रमाणे ३ शिफ्टमध्ये काम अद्याप सुरू न झाल्याने ते तातडीने सुरू करण्याची आवश्यकता असणे,त्याचप्रमाणे,भारत डायनॅमिक्सला ४०० एकर जागा देऊनही तो प्रकल्प अद्याप सुरू झाला नसल्याने स्थानिक विकासाचे उद्दिष्ट साध्य होण्यात अडथळे येत असणे,औद्योगिक पायाभूत सुविधांच्या सक्षमीकरणासाठी मेगा टेक्स्टाईल पार्कप्रमाणेच इतर उद्योगांसाठीही सांडपाणी प्रक्रिया पुनर्वापर प्लँट(STP/ETP) लावणे गरजेचे असणे, ज्याचा थेट फायदा तेथील इतर उद्योगांना होऊ शकणे, अमरावती विभागातून माल वाहतुकीसाठी येणारा मोठा खर्च कमी करण्यासाठी या भागात 'एक्स्पोर्ट कंटेनर डेपो टर्मिनल' उभारणे ही उद्योजकांची जुनी मागणी असणे, या सर्व बाबींचा विचार करता, अमरावती विभागाच्या औद्योगिक

पुनरुज्जीवनासाठी आणि बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**सात : शासकीय विधेयके —**

**(क) मुख्यमंत्री यांचा प्रस्ताव (म.वि.प.नियम १४९ अन्वये)**

"सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६ — भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६" मागे घेण्यास अनुमती द्यावी.

**(ख) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १७ — भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६

**(२)** सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १८ — महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (चौथी सुधारणा) विधेयक, २०२६

**(ग) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ - महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ - महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

**(३)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ - महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ - महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(४)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(५)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ - महाराष्ट्र औद्योगिक संबंध (निरसन) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ - महाराष्ट्र औद्योगिक संबंध (निरसन) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**आठ : अशासकीय विधेयके :-**

**(क) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२६ चे वि.प.वि. क्रमांक १२ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२६- श्री.सतेज उर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांचे

**(२)** सन २०२६ चे वि.प.वि. क्रमांक १३ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०२६- श्री.सतेज उर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांचे

**(३)** सन २०२६ चे वि.प.वि. क्रमांक १४ - महाराष्ट्र राज्यातील बेरोजगार युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता विधेयक, २०२६- श्री.सतेज उर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांचे

**(४)** सन २०२६ चे वि.प.वि. क्रमांक १५ - महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्हयांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, जाहिरात-फलक लावण्यास, समाज माध्यमांवर व संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२६- श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे

**(५)** सन २०२६ चे वि.प.वि. क्रमांक १६ - महाराष्ट्र अल्पभूधारक शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२६- श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे

---

**(ख) विचारार्थ :-**

**(१)** सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक १२ - महाराष्ट्र राज्यात मराठी व्यक्तींना घरे आरक्षित ठेवण्यासाठी विधेयक, २०२५- ॲड.अनिल परब, वि.प.स. यांचे

**(२)** सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक ११ - महाराष्ट्रातील भावी पिढीच्या शाश्वत भवितव्याची तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२५- श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांचे

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २ जुलै, २०२६.

**डॉ.विलास आठवले,**
सचिव - ३ ,
महाराष्ट्र विधानपरिषद.